जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-25/2018
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 20.11.2018

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. भवरे शिलाबाई किशोर** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 29.11.2018 रोजी दुपारी 03.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

दिनांक 16.05.2018 रोजी मागी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**विषय क्रं. 02**

शासन निर्णय दि. 16.10.2018 अन्वये नावाशमनपाकेतील कर्मचां-यांनाही सुधारीत दराने महागाई भत्ता लागु करण्यात आला असुन त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्रं. 03**

शासन निर्णय दि. 17 ऑक्टोंबर 2018 च्या शासन निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील असुधारीत वेतनश्रेणीतील निवृत्तीवेतनधारक / कुटूंब निवृत्तीवेतन महागाई वाढीची रक्कम दिनांक 01 ऑक्टोंबर 2018 पासुन रोखीने अदाई करण्याची प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत

**विषय क्रं. 04**

श्री हनुमंत सदाशिव पवार कंत्राटी कनिष्ठ अभियंता यापदावरुन मनपाकेच्या कंत्राटी सेवेतुन 16.03.17 च्या आदेशान्वये कायमचे कमी करण्यात आले होते. उपरोक्त शिक्षेच्या विरुध्द मनपाकेच्या स्थायी समितीकडे अपिल सादर करुन त्यांना पुर्ववत कामावर घेण्याची विनंती केली होती स्थायी समितीने संबंधीतास पुर्ववत कामावर घेण्याची अपिल मंजुर करुन ठराव क्रं. 42 दिनांक 29.05.2017 पारीत केलेला आहे. सदर ठराव हा प्रशासकीय टिप्पणीच्या विरुध्द असुन नियमबाहय आहे त्यामुळे मनपाकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं 42 दिनांक 29.05.2017 विखंडीत करण्याची विनंती आयुक्ता मनपा नांदेड यांनी केलेली आहे. उपरोक्त नमुद बाबी विचारात घेता मनपाकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 42 दि. 29.05.2017 हा व्यापक लोकहिताच्या विरुध्द असल्याचे शासनाचे मत झाल्याने सदर ठराव निलंबीत केलेला आहे त्याची नोंद घेणे बाबत

**विषय क्रं. 05**

नांदेड शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजनेत सेक्टर डी मधील स.नं. 119 मध्ये ईपी 11(6) नुसार मध्यवर्ती इमारत (महसुल) सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविलेले आहेत. त्यापैकी 1.6 हेक्टर जागा मुस्लीम कब्रस्तानसाठी आरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी मनपा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 06**

नांदेड वाघाळा शहर हानगरपालिका हद्यीतील व्यंकटराव तरोडेकर मार्केट BOT तत्वावर विकसीत करण्यासाठी सर्वात जास्त प्रिमीयम (देकार) राज डेव्हलपर्स नांदेड यांची असल्याने मंजुर करणे बाबत

**विषय क्रं. 07**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 94 नुसार वार्षिक लेखे जमा खर्चाच्या लेख्यांसह तयार करण्यात आले असुन त्यानुसार नांदेड वाघाळा शहरम हानगरपालिकेचे लेखे स्थायी समितीने नेमुन दिलेल्या नमुना 17 अन्वये सालसन 2012-13, 2013-14, 2014-15, 2015-16, व 2016-17 चे वार्षीक लेखे मनपा स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर केलेले असुन सदरील लेखे हे मागील 05 वर्षाचे एकदाच उशिराने सादर केलेले असुन त्यास प्रशासन जबाबदार असल्याने त्यावर निर्णय घेण्यासाठी मनपा स्थायी समिती सभा दिनांक 12.10.18 ठराव क्रं. 74 अन्वये मनपा सर्वसाधारण सभेस शिफारस केल्या बाबत.

**विषय क्रं. 08**

श्री बि.डी. शिंदे (महासचिव) मराठवाडा असोसिएशन ऑफ दि ब्लाईन्ड नांदेड यांच्या अर्जानुसार संबंधीतास संस्थेस बोलके वाचनालय सुरु करण्यासाठी एकूण खर्च अंदाजे रुपये 1,59,500/- देण्यासाठी सर्वसाधारण सभेस मान्यतेस्तव सादर.

**<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>**

**विषय क्रं. 09:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत जुन्या नांदेड शहरातील देगलुर नाका भागात हैदरबाग, हैदरबाग नं.02, गुलजार बाग, इम्रान कॉलनी, गुलशन कॉलनी, इस्लामपुरा, उस्मानपुरा, बरकतपुरा, ममता कॉलनी, गोदावरी कॉलनी, रहेमतनगर, मोहम्मदीया कॉलनी, मोहसीन कॉलनी, लक्ष्मीनगर, हारुन बाग, वाल्मीकनगर, पोची कॉलनी, खुसरोनगर, बागवान कॉलनी, उमरी कॉलनी इत्यादी मध्ये दाट वस्ती असुन या वसाहती मध्ये दाट लोकवस्ती झालेली आहे. या ठिकाणी अनेक शासनाच्या/मनपाकेच्या अनेक योजनेतुन विकास कामे करण्यात आलेली आहे. सदरील भागात कच्चे व पक्के बांधकामे झालेले असुन या ठिकाणी सुधारीत विकास आराखडानुसार सेक्टर-डी मधील प्रस्तावित आरक्षण क्रमांक 05, 07, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 19, 20, 21, 22, 23, 25, 24, हे सदरील ठिकाणी आरक्षणानुसार अमलबजावणी करणे शक्य नसल्यामुळे सदरचे आरक्षण हे सर्वे क्रं. 158, 162 चा भाग, 136 चा भाग, तसेच नविन ब्रम्हपुरीचा हद्यवाढीसाठी तयार करण्यात येत असालेल्या विकास आरखडयातील मोकळया जागे मध्ये आरक्षण करुन करणे बाबत

**सुचक** :- स. शेर अली महेबुब अली — **अनुमोदक :-** म. मसुद अहेमद खान

**विषय क्रं. 10:-**

अमृत योजने अंतर्गत कोणकोणती विकास कामे प्रस्तावित करता येऊ शकतात व निकष काय आहे याची सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवण्यात यावी असे ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- मो. साबेर चाऊस नासेर चाऊस — **अनुमोदक** :- अ. लतीफ, फारुख अली खान, अ. हफीज, रीहाना बेगम चाँद पाशा

**विषय क्रं. 11:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत असलेले चतुर्थश्रेणी कर्मचारी श्री स. जिलानी स. मौला यांना दिनांक 25.08.2014 रोजी मुत्रपिंड प्रतिरोषण (kindny Transplantation) चा शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. करिता संबंधीत कर्मचारी हे कर्जबाजारी असल्यामुळे व उपचार करण्यासाठी विशेष बाब म्हणुन संबंधीतांस मंजुर करण्यात आलेली आर्थीक रक्कमेपैकी शिल्लक असलेली रक्क्म रुपये 1.50 लक्ष तात्काळ अदाई करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

**सुचक :-** अब्दुल शमीम अब्दुल्ला साब — **अनुमोदक :-** अ. रशीद अ. गणी, अ. हफीज अ. करीम

**विषय क्रं. 12:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत रमाई आवास योजना व प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजने मध्ये वाटणीपत्र असलेल्या नागरिकांना घरकुलाचा लाभ मिळणे आवश्ये आहे ज्या नागरीकांचे वाटणीपत्र आहे. त्यांच्या वाटणीपत्र करुन देणा-या व्यक्तीकडे मुळ रजिस्ट्री, 7/12 उतारा, मालमत्ता पत्रक असल्यास अशा नागरीकांना घरकुल देण्यास हरकत नसल्यामुळे रुपये 100/- च्या बाँड पेपरवर शपथपत्र घेवुन वाटणीपत्रा आधारे घरकुल देण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंती देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- सौ. संगिता सखाराम तुप्पेकर — **अनुमोदक** :- सौ. ज्योती मनिष कदम

**विषय क्रं. 13:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 07 मधील खालील ठिकाणी रस्त्यास व चौकास नांव देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. (1) प्रभाग क्रं. 07 मधील श्रावस्तीनगर येथील रोड क्रं. 35 काब्दे हॉस्पीटल ते मनपा हद्यी पर्यंतच्या रस्त्यास **<u>माता भिमाई मार्ग असे नांव देणे</u>** (2) प्रभाग क्रं. 07 मधील पावडेवाडी रोडवरील छत्रपती राजर्षी शाहु महाराज पुतळयाच्या पाठीमागील नविन रस्त्यास **<u>माता रमाई मार्ग असे नांव देणे</u>**

**सुचक**:-सौ.ज्योती सुभाष रायबोले, चव्हाण उमेशसिंह — **अनुमोदक**:- अ.अलीम खान अ.जलील खान, पाटील संगिता विठ्ठल

**स्वाक्षरीत/-**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**